## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नविन प्रशासकीय इमारत,
विधान भवन समोर,पुणे-४११००१

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. केशव साहेबराव राजेनिंबाळकर | लगतच्या यादीप्रमाणे | |

( सुनावणी दिनांक- दि.३१ / १० / २०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये १२२ द्वितीय अपिले (लगतच्या यादीप्रमाणे) दाखल केलेली आहेत.

| अनु. क्र. | प्राधिकरणाचे नाव | दाखल केलेली एकूण द्वितीय अपील |
|---|---|---|
| १. | उपवनसंरक्षक वन विभाग (पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर) | ५४ |
| २. | जिल्हा परिषद कार्यालय (पुणे, सोलापूर, सातारा) | ४२ |
| ३. | जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | २२ |
| ४. | जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, सोलापूर | ०३ |
| ५. | सार्वजनिक बांधकाम मंडळ कार्यालय, सोलापूर | ०१ |
| | एकूण | १२२ |

१. एकाच अपिलार्थीने विविध प्राधिकरणाच्या संदर्भात एवढ्या मोठ्या प्रमाणावर द्वितीय अपिले दाखल केलेली असल्याने या अपिलाची सुनावणी दि. ३१ / १० / २०२५ रोजी नेमण्यात आली असल्याबाबत आयोगाकडील नोटीशीद्वारे अपिलार्थी व प्रतिवादी यांना कळविण्यात आलेले आहे, त्यानुसार सर्व द्वितीय अपिलावर सुनावणी घेण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रकरणातील सर्व माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी कालावधी तसेच शब्दांची अदालाबदल करुन एक सारखीच माहिती त्या त्या प्राधिकरणाकडे मागितलेली आहे. या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी त्या त्या प्राधिकरणाकडे सादर केलेल्या बहुतांश सर्व प्रथम अपिलामध्ये, विहित मुदतीत माहिती अप्राप्त / टाळाटाळ,

असे प्रयोजन नमूद केलेले आहे. तसेच आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना बहुतांश व्दितीय अपिलांच्या प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

३. सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित असुन त्यांना त्यांनी मोठ्या प्रमाणावर सादर केलेल्या माहिती अर्ज व प्रथम अपील अर्ज आणि त्या संदर्भात आयोगाकडे तेवढीच व्दितीय अपिले दाखल करण्यामागील भूमिकेची विचारणा केली असता, माहिती मिळत नाही, सुनावणीमधील सर्व प्रकरणांबाबत मला (अपिलार्थी) प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतरही जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही / टाळाटाळ केली.

४. सुनावणीचे वेळी अपिलार्थीना त्यांच्या प्रत्येक अपिलाबाबत तसेच एकत्रितरीत्या लेखी युक्तिवाद / निवेदन सादर करावयाचे असल्यास आयोगाने त्यासाठी १५ दिवसांची मुदत दिली होती. परंतु त्यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले नाही.

५. इतक्या मोठ्या संख्येने माहिती अर्ज, प्रथम अपीले व द्वितीय अपीले सादर करण्यामागे कोणते व्यापक जनहित साधावयाचे आहे याबाबत अपिलार्थीस सुनावणीत विचारणा करण्यात आली असता, त्यावर त्यांनी कोणतेही समाधानकारक उत्तर दिले नाही, तसेच त्याच्या या कृतीच्या समर्थनार्थ कोणतीही कारणमीमांसा अथवा माहिती आयोगास सादर केली नाही.

६. अपिलार्थी यांनी पुणे खंडपीठाकडे माहे मार्च-२०२५ ते जुलै-२०२५ या कालावधीमध्ये एकूण १२२ द्वितीय अपिले दाखल केली आहेत.

७. यापूर्वी राज्य माहिती आयोग, छ.संभाजी नगर, खंडपीठाने अपिलार्थी यांची दिनांक २६/०६/२०२४ च्या निर्णयान्वये २७८८ इतकी अपिले फेटाळली होती. तसेच दि.२३/१२/२०२४ च्या निर्णयानुसार अपिलार्थीची ८४२ इतकी द्वितीय अपिले फेटाळलेली आहेत.

८. तसेच राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांनी अपिलार्थी यांची दिनांक २४/१२/२०२४ च्या निर्णयान्वये २९५५ इतकी द्वितीय अपिले फेटाळली आहेत.

९. दि. ३१.१०.२०२५ रोजीच्या सुनावणी दरम्यान उपस्थित सर्व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी यांच्या मोठ्या प्रमाणावर वारंवार माहिती अर्ज करण्याच्या कारणाबद्दल तसेच अपिलार्थी यांच्या प्रथम अपील व व्दितीय सादर करण्याच्या प्रयोजनाबाबत विचारणा केली असता त्यांनी असे अवगत केले की, अपिलार्थी वारंवार माहिती अर्जाची शृंखला सादर करुन प्रशासनावर दबाव निर्माण करतात, दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद देऊन अपिलार्थी यांना शुल्क भरणा करणेबाबत किंवा विस्तृत माहितीबाबत अवलोकन करणेबाबत सुचित केले असता अनुक्रमे अपिलार्थी शुल्काचा भरणा करत नाहीत व अवलोकनासाठी उपस्थित राहत नाहीत, बहुतांश वेळा अवलोकनाचे पत्र त्यांना प्राप्त झाल्यानंतर ते त्यांच्या सोयीचा दिनांक नमूद करुन नमूद दिनांकास मी (अपिलार्थी) अवलोकनासाठी येत असुन अवलोकन द्यावे, असे कळवितात, मात्र त्यांनी कळविलेल्या पत्रानुसारही ते अवलोकनासाठी येण्याचे टाळुन वेळ मारुन नेतात आणि माहिती मिळाली नसल्याचा बनाव करुन प्रथम

अपिलाची व व्दितीय अपिलाची शृंखला दाखल करतात.

१०. अपिलार्थी यांच्या अशा असहकार्याच्या भूमिकेचा दैनंदिन शासकीय कामकाजावर विपरित परिणाम होतो. कारण अपिलार्थीच्या माहिती अर्जातील विस्तृत माहिती प्रथमतः एकत्रित /संकलित करुन ती अवलोकनास्तव देणे अपेक्षित आहे. अपिलार्थी हे माहिती अधिकारातंर्गत अभिप्रेत असलेली सकारात्मक भूमिका पार पाडण्याऐवजी नेहमी असहकार्याची भूमिका घेतात, तसेच प्रत्येक प्रकरणात वाटाघाटी / तडजोड (सेटलमेंट) कशी होईल यासाठी ते प्रयत्नशील असतात, असा गंभीर आरोप उपस्थित अधिकाऱ्यांनी केलेला आहे. तसेच अपिलार्थी हे माहिती मिळविण्यासाठी नव्हे तर स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी माहिती अधिकार कायद्याचा अनिर्बंधपणे सर्रास दुरुपयोग करत असल्याचा गंभीर आरोपही उपस्थित जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर आपली बाजू मांडताना केला.

११. दि. ३१.१०.२०२५ रोजीच्या सुनावणीस उपस्थितीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने बाजु मांडण्याची संधी दिली असता, अपिलार्थी शक्यतोवर सुनावणीस उपस्थित राहण्याचे टाळतात, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक दृष्टीकोनातुन कार्यवाही केलेली असते, मात्र अपिलार्थी हे प्रथम अपील दाखल करताना एकच ठरलेले प्रयोजन " विहित मुदतीत माहिती अप्राप्त / टाळाटाळ " असे त्यांचे ब्रीद वाक्य असल्यासारखे नमूद करतात.

१२. अपिलार्थी, आयोगाकडे मोठ्या संख्येने द्वितीय अपिले दाखल करुन माहिती अधिकार कायद्याचा शस्त्र (Tool) म्हणून वापर करत आहेत. अपिलार्थीस माहिती मिळविण्यात कुठलेही स्वारस्य नाही. अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा सर्रास दुरपयोग करीत असून त्या आधारे विविध शासकीय प्राधिकरणामध्ये दहशत निर्माण करणे हा त्यांचा हेतु आहे. अपिलार्थी हे स्वत:चे स्तोम माजविण्याच्या हेतुने या कायद्याचा अनिर्बंध वापर करून अनेक कार्यालयाकडे शेकडोच्या संख्येने माहिती अर्ज, प्रथम अपिल अर्ज करत आहेत, त्यामुळे त्यांचा प्राधिकरणाच्या दैनंदिन कामकाजावर अनिष्ठ परिणाम झाला असल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास समक्ष सांगितले.

<u>अपिलार्थी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिलांची तपासणी केली असता खालील बाबी आयोगाच्या निदर्शनास आल्या आहेत.</u>

१. अपिलार्थी यांनी सार्वजनिक प्राधिकरणाकडे केवळ मोठ्या संख्येने माहिती अर्ज केलेले नसून या सर्व अर्जामध्ये जाणीवपूर्वक दीर्घ कालावधीची व विस्तृत स्वरूपाच्या माहितीची मागणी केली आहे. अनेक माहिती अर्जाद्वारे अपिलार्थी यांनी वेगवेगळ्या विषया बाबत उदाहरणार्थ वनक्षेत्रपाल व अंतर्गत रेंज मधील सर्व कर्मचारी यांची मूळ जात प्रमाणपत्रे, जात पडताळणी, जात वैधता १९५० च्या जातीचा पुरावा, कर्मचाऱ्यांची अपंग प्रमाणपत्रे. इ बाबत सन २००० पासूनच्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रतीची मागणी केली आहे. यासंदर्भात सादर केलेल्या सर्व प्रथम अपिलामध्ये " विहित मुदतीत माहिती अप्राप्त/ टाळाटाळ " असे आणि या संदर्भातील सर्व द्वितीय अपिलावर " प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही " असे मोघम कारण नोंदविले आहे. अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या कोणत्याही द्वितीय अपिलासोबत जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराची प्रत अथवा प्रथम अपिलीय



राज्य माहिती आयोग पुणे खंडपीठ

अधिकारी यांचे आदेश अथवा सुनावणीचे पत्र यापैकी कोणत्याही कागदपत्राची प्रत जोडलेली नाही.

२. सर्व साधारणपणे एका द्वितीय अपिलासाठी केवळ कागदपत्रासाठी होणारा रुपये १००/- इतका खर्च (माहिती अर्ज, प्रथम अपील व व्दितीय अपील याकरिता कोर्ट फी स्टॅम्प, इतर झेरॉक्स, टपालखर्च इ. एकत्रित खर्च) गृहित धरला असता अपिलार्थी यांनी त्यांच्या या सूनावणीतील व्दितीय अपिलांसाठी सुमारे रु. १२,२००-/ इतका खर्च केला आहे. अपिलार्थी त्यांच्या अपिलासांठी बारा हजार दोनशे रुपये एवढा खर्च का करत आहेत? ही बाब संशयास्पद आहे. त्यामुळे द्वितीय अपिल करण्यामागील त्याच्या उद्देशाबाबत संशय निर्माण होत आहे.

आयोगाने या प्रकरणी निर्णयाप्रत येताना, मा.सर्वोच्च न्यायालय, केंद्रीय माहिती आयोग, यांनी विविध प्रकरणात दिलेले न्यायनिवाडे, अधिनियमाची प्रस्तावना, अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे युक्तिवाद, त्यांनी सादर केलेले व प्रकरणात उपलब्ध असलेले अभिलेख इत्यादि खाली नमूद केलेल्या बाबी विचारात घेतल्या आहेत.

(१) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून अपिलार्थी यांनी वेगवेगळ्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे सादर केलेले माहिती अर्ज, प्रथम अपीले व राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेली द्वितीय अपीले यासाठी हेतुत: अवलंबलेली कार्यपद्धती याची पडताळणी अधिनियमाच्या प्रस्तावनेत नमूद तत्वांशी करण्यात आली. या अधिनियमच्या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की,

"ज्या अर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी ज्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांचे यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत."

आणि ज्या अर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबींनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्यता कायम राखतांना, या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे.

त्या अर्थी, आता माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विविक्षत माहिती पुरविण्या करिता तरतूद करणे इष्ट होईल. म्हणून शासकीय कामकाज सुचारु व सामोपचाराने चालविणे आणि माहिती अधिकाराचे कामकाजात सुसूत्रता यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

(२) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील ६४५४/२०११ दिनांक ०९.०८.२०११ रोजी Applicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of

oppression or intimidation of honest officials striving to do their duty-Nation does not want a scenario where 75 % of the staff of public authorities spend 75% of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharge ing their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

तसेच शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

(३). मा.उच्च न्यायालय आंधप्रदेश, हैद्राबाद येथील रिट पिटीशन क्र.२०१८२, दिनांक २७.०१.२००९ मध्ये खालील आदेश दिलेले आहेत.

"The Act is an effective device which if utilized judiciously and properly, would help the citizens to become more informed. It no doubt relieves an applicant from obligation to disclose the reason as to why he wants the information. However, indiscriminate efforts to secure information just for the sake of it, and without there being any useful purpose to serve, would only put enormous pressure on the limited human resources that are available. Diversion of such resources, for this task would obviously, be, at the cost of ordinary functioning. Beyond a point, it may even become harassment, for the concerned agencies. Much needs to be done in this direction to impart a sense of responsibility to those, who want to derive benefit under the Act to be more practical and realistic."

(४). केंद्रीय माहिती आयोगाने CIC/LS/२०१२/०००८५८-SA ते ०००८७२-SA संदर्भात दिनांक ०४.०७.२०१४ रोजी पारित केलेल्या आदेशात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

Earlier Obervation of CIC : Shri. M.M.Ansari

" In several occasions earlier the Central Information Commission referred to the issue of repeated RTI requests and harassing tendency. In Prem Prakash Kumar V NFL, Panipat,(Decision No.246/IC(A)2006, FNo.CIC/MA/A/2006/00374 & 375 dated 28 August 2006) the applicant sought documents and specific comments of CPIO on 89 queries. The learned Commissioner Shri M.M.Ansari observed that in fact, the nature of queries and information sought are such that the information seeker would never be satisfied because the promotion of self-

interest, rather than public interest, was dominant, as the appellant had sought redressed of grievances. "

(५). तसेच, मा. शैलेश गांधी यांनी नमूद केले आहे की, अपिलार्थी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा कायदेशीर हत्यार म्हणून करीत आहेत, जो अत्यंत त्रासदायक स्वरुपाचा आहे, याबाबत खालीलप्रमाणे निरीक्षण नमूद केले आहे.

It is relevant here to quote a paragraph from the order of Learned Information Commissioner Shri Shailesh Gandhi in case numbers No.CIC/ SG/ C/ 2011/000760, CIC/SM/2011/000926/SG, CIC/SM/A/2011/ 001111/SG, CIC/SM/ A/2011/002909 dated 17 th January, 2012) in a second appeal "The commission, at several appellate hearing, has explained to the complainant that under RTI Act, only the information as per records can be made available, multiple RTI applications and appeals would not provide him any information beyond the records that exists. The Commission recognizes the fact that valuable time of complainant, respondent public authority as well as the Commission is being spent in merely going through the motion prescribed under the RTI Act again and again to obtain similar information..... At this juncture the Commission would like to mention that the right to information is a fundamental right of the citizens, It cannot be used indiscriminately to fulfill the demand of one individual. In the present matter. It must be noted that the complainant is pursuing multiple litigation and various public authorities are being asked to divert and extraordinarily disproportionate amount of resources just to respond to hundreds of RTI applications filled by him....The Commission is also conscious of the fact that it is financed by the poorest man in this country who may be starving to death. The Complainant by repeatedly filling similar RTI application and appeals with the respondent public authority and the commission is wasting public resources."

तसेच असेही नमूद केले आहे की, वारंवार माहिती अर्ज करणारे अर्जदार हे माहितीची मागणी / प्रकटीकरण हे त्यांचा अंतस्थ व्यक्तिगत हेतू साध्य करण्यासाठी करतात, त्यामध्ये व्यक्तिगत हिताचा विचार असल्याने सार्वजनिक हित साध्य होणार नसते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद वैधानिक उद्देश स्पष्टपणे साध्य होत नाही.

(६) राज्य माहिती आयोग, कर्नाटक यांनी अपिलार्थी Davalsab M. Miyanavar यांची एकूण ९६४६ द्वितीय अपिले फेटाळली आहेत. आयोगाच्या या निर्णयाविरूद्ध अपिलार्थी यांनी मा. उच्च न्यायालय, कर्नाटक येथे रिट याचिका क्र. १०१२६० OF २०२४ (GM-RES) Davalsab M. Miyanavar Vs Karnataka Information Commission & Ors. Respondents दाखल केली असून त्यामध्ये मा. उच्च न्यायालय कर्नाटक, (धारवाड बेंच) यांनी दिनांक२५.०९.२०२४ रोजी पारित केलेल्या आदेशात खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवून रिट याचिका फेटाळली आहे.

" The present case is a classic example of how indiscriminate use of the RTI

Act can adversely affect public administration. The petitioner◦s actions, if allowed to continue, would not only waste valuable public resources but would also delay the processing of genuine RTI applications filed by citizens seeking information in good faith.

Upon considering the facts and circumstances of this case, along with the relevant judicial precedents, this Court is of the opinion that the petitioner has clearly misused the provisions of the RTI Act. The petitioner's 5 (2020) 5 SCC 481 14 conduct in filing thousands of RTI applications across multiple departments, without any legitimate reason or cause, constitutes an abuse of the process of law. The petitioner◦s request to withdraw the writ petition without paying the requisite court fees is not acceptable, as it would set a dangerous precedent and encourage further misuse of the RTI Act.

The registry is directed to take necessary steps to recover the deficit court fee of Rs. 9,64,600/- from the petitioner in accordance with law. The petitioner shall be liable to pay the entire deficit amount as per the objections raised by the office of this Court. "

सदर प्रकरणी निर्णयाप्रत येण्याच्या प्रक्रियेत वरील परिच्छेद क्रमांक (१) ते (६) मधील सर्व बाबी तपशीलवाररित्या विचारात घेता आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१) माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये नमूद तरतूदीनुसार अपिलार्थीस माहिती मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तरी, शासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेला माहिती मिळावी आणि शासकीय कामात कार्य तत्परता असावी असा या कायद्याचा मुख्य हेतु आहे. तथापि अपिलार्थी यांनी विपरीत भूमिका घेऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग करण्यासाठी सुनियोजित पद्धतीने अनेक सार्वजनिक प्राधिकरणांकडे जाणीवपूर्वक अतिविस्तृत, दिर्घकालावधीची, मोघम स्वरूपाच्या माहितीची मागणी करण्यासाठी मोठ्या संख्येने माहिती अर्ज, प्रथम अपीले व त्यानुषंगाने मोठ्या संख्येने आयोगाकडे द्वितीय अपीले सादर केली आहेत.

२) अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चा वापर करून मोठ्या संख्येने माहिती अर्ज, प्रथम अपीले आणि द्वितीय अपीले सादर करण्याच्या या कृतीशी कोणते व्यापक जनहित निगडित आहे हे नमूद केले नाही, याबाबत त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीत त्यांना संधी दिली असता ते याबाबत काही सांगू शकले नाहीत. यावरून त्यांच्या या कृतीशी कोणतेही व्यापक सार्वजनिक हित निगडीत नाही आणि ती या अधिनियमाच्या प्रस्तावनेत नमूद केलेल्या तत्त्वाशी विसंगत आहे ही बाब स्पष्ट आहे.

३) अपिलार्थी यांनी त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा (माहिती अधिकार) माफक पध्दतीने वापर करणे आवश्यक असूनही त्यांनी माहिती अधिकार कायद्याचा जाणीवपूर्वक अनिर्बंध व अवाजवी दुरुपयोग केला आहे.

४) अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा अनिर्बंध व अवाजवी वापर केला असल्याने संबंधित शासकीय कार्यालये / प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ, साधनसामग्री व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडुन सदर शासकीय कार्यालयांकडुन सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे त्या महत्वाच्या दैनंदिन शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे.

५) अशा मोठ्या प्रमाणावर अर्ज करण्याच्या कार्यपद्धती मुळे गरजवंत अर्जदारांवर अन्याय होऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीस गतीरोध निर्माण होत आहे. त्याचा निश्चितपणे कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे.

उपरोक्त सर्व बाबी तसेच मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा.केंद्रीय माहिती आयोगाकडील अशा प्रकरणी वेळोवेळी दिलेले, ऐतिहासिक, क्रांतीकारी व लक्ष्यवेधी निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या /प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होत आहे व संबंधित शासकीय खात्यांचा / प्राधिकरणांचा बहुमूल्य वेळ वाया जात असल्याचे दिसून येते. ही बाब माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झाले आहे. म्हणून अपीलार्थी यानी दाखल केलेल्या द्वितीय अपिलांमध्ये कोणतेही तथ्य किंवा गुणवत्ता आढळून येत नसल्यामुळे व त्यातून कोणतेही जनहित साध्य होत नसल्यामुळे सर्व १२२ द्वितीय अपिले कोणत्याही निर्देशाविना फेटाळण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

उपरोक्त पार्श्वभूमिवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश.**

अपिलार्थी यांची सर्व १२२ व्दितीय अपिले फेटाळण्यात येत आहेत.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

---

जा.क्र.--10,000/2025-------- दिनांक :--17/11/2025--------

| अ.क्र | अपिल क्रमांक | अपिल वर्ष | जिल्हा | जन माहिती अधिकारी पदनाम व कार्यालय | प्रथम अपिलीय अधिकारी पदनाम व कार्यालय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २९२६ | २०२५ | कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | २९२९ | २०२५ | कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर. |
| ३ | २९३० | २०२५ | कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र गडहिंग्लज जि.कोल्हापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर. |
| ४ | २९३१ | २०२५ | कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र गगनबावडा, जि.कोल्हापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर. |
| ५ | २९३२ | २०२५ | कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र करवीर ता.करवीर जि.कोल्हापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर. |
| ६ | २९३३ | २०२५ | कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र कागल ता.कागल जि.कोल्हापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर. |
| ७ | २९३४ | २०२५ | कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र हातकणंगले, जि.कोल्हापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर. |
| ८ | २९३५ | २०२५ | कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र मलकापूर ता.मलकापूर जि.कोल्हापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर. |
| ९ | २९३६ | २०२५ | कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र पन्हाळा ता.पन्हाळा जि.कोल्हापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर. |
| १० | २९३७ | २०२५ | कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र राधानगरी, जि.कोल्हापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | २९३८ | २०२५ | कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र गारगोटी, जि.कोल्हापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर. |
| १२ | २९३९ | २०२५ | कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र चंदगड, जि.कोल्हापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर. |
| १३ | २९४० | २०२५ | कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र खानापूर विटा, जि.कोल्हापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर. |
| १४ | २९९९ | २०२५ | कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, विभागीय वन अधिकारी वन्यजीव कार्यालय सदर बाजार विचारे मळा, कोल्हापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी वन्यजीव कार्यालय सदर बाजार विचारे मळा, कोल्हापूर. |
| १५ | ३००७ | २०२५ | कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल (वन्यजीव) आंबा रेंज मु.पो.आंबा ता.शाहूवाडी जि.कोल्हापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी वन्यजीव कार्यालय सदर बाजार विचारे मळा, कोल्हापूर. |
| १६ | १२३८ | २०२५ | कोल्हापूर | वनक्षेत्रपाल (वन्यजीव), आंबा रेंज निसर्ग पर्यटन केंद्र मु. पो. आंबा ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी (वन्यजीव),जि. कोल्हापूर. |
| १७ | ३००९ | २०२५ | कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल (वन्यजीव) दाजीपूर रेंज, दाजीपूर जि.कोल्हापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) विचारे मळा कोल्हापूर. |
| १८ | ३०१० | २०२५ | कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल (वन्यजीव) रेंज राधानगरी, जि.कोल्हापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) विचारे मळा कोल्हापूर. |
| १९ | २९९६ | २०२५ | कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, विभागीय वन अधिकारी वन्यजीव कार्यालय सदर | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी (वन्यजीव)जि.कोल्हापूर. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | बाजार विचारे मळा, कोल्हापूर. | |
| २० | ३००० | २०२५ | कोल्हापूर | जन माहिती अधिकारी, उपसंचालक (चांदोली) सह्याद्री व्याघ्र राखीव, कराड आगाशीवनगर, मलकापूर, जि.सातारा. | प्रथम अपिलीय अधिकारी, उपसंचालक (चांदोली) सह्याद्री व्याघ्र राखीव,कराड आगाशीवनगर,पो.मलकापूर ता.कराड जि.सातारा. |
| २१ | २२२० | २०२५ | पुणे | जन माहिती अधिकारी, पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद पुणे. | प्रथम अपिलीय अधिकारी, पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद पुणे. |
| २२ | २२२१ | २०२५ | पुणे | जन माहिती अधिकारी, पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद पुणे. | प्रथम अपिलीय अधिकारी, पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद पुणे. |
| २३ | २२२२ | २०२५ | पुणे | जन माहिती अधिकारी, पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद पुणे. | प्रथम अपिलीय अधिकारी, पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद पुणे. |
| २४ | २२२६ | २०२५ | पुणे | जन माहिती अधिकारी, पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद पुणे. | प्रथम अपिलीय अधिकारी, पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद पुणे. |
| २५ | २२२९ | २०२५ | पुणे | जन माहिती अधिकारी, पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद पुणे. | प्रथम अपिलीय अधिकारी, पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद पुणे. |
| २६ | २९९८ | २०२५ | पुणे | जन माहिती अधिकारी, उपविभागीय वनअधिकारी कार्यालय भोर वनविभाग भोर,जि.पुणे. | प्रथम अपिलीय अधिकारी, उपविभागीय वनअधिकारी कार्यालय भोर वनविभाग भोर,जि.पुणे. |
| २७ | २९९५ | २०२५ | पुणे | जन माहिती अधिकारी, उपविभागीय वनअधिकारी कार्यालय भोर वनविभाग भोर,जि.पुणे. | प्रथम अपिलीय अधिकारी, उपविभागीय वनअधिकारी कार्यालय भोर वनविभाग भोर,जि.पुणे. |
| २८ | ३००३ | २०२५ | पुणे | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल (प्रादेशिक) सासवड रेंज (वाघडोंगर) मु.पो.सासवड जि.पुणे. | प्रथम अपिलीय अधिकारी, उपविभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) भोर वनविभाग भोर,जि.पुणे. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २९ | ३००४ | २०२५ | पुणे | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल (प्रादेशिक) वेल्हा रेंज ता.वेल्हा जि.पुणे. | प्रथम अपिलीय अधिकारी, उपविभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) भोर वनविभाग भोर,जि.पुणे. |
| ३० | ३००५ | २०२५ | पुणे | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल (प्रादेशिक) नसरापुर रेंज मु.पो.नसरापुर ता.भोर जि.पुणे. | प्रथम अपिलीय अधिकारी, उपविभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) भोर वनविभाग भोर,जि.पुणे. |
| ३१ | ३००६ | २०२५ | पुणे | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल (प्रादेशिक) भोर रेंज सांगवी ता.भोर जि.पुणे. | प्रथम अपिलीय अधिकारी, उपविभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) भोर वनविभाग भोर,जि.पुणे. |
| ३२ | २९२७ | २०२५ | सांगली | जन माहिती अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग,सांगली. |
| ३३ | २९२८ | २०२५ | सांगली | जन माहिती अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग,सांगली. |
| ३४ | २९४१ | २०२५ | सांगली | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र तासगाव, जि.सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, सांगली . |
| ३५ | २९४२ | २०२५ | सांगली | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र कवठेमहंकाळ, जि.सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग,सांगली . |
| ३६ | २९४३ | २०२५ | सांगली | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र जत ता.जत जि.सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग,सांगली . |
| ३७ | २९४४ | २०२५ | सांगली | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र आटपाडी, जि.सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग,सांगली . |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३८ | २९४५ | २०२५ | सांगली | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र पलूस, जि.सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग,सांगली . |
| ३९ | २९४६ | २०२५ | सांगली | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र शिराळा, जि.सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग,सांगली . |
| ४० | २९४७ | २०२५ | सांगली | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र इस्लामपूर, जि.सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग,सांगली . |
| ४१ | २९४८ | २०२५ | सांगली | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र सांगली रेंज वनवसाहत हनुमाननगर कुपवाड जि.सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग,सांगली . |
| ४२ | ३००८ | २०२५ | सांगली | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल (वन्यजीव) सागरेश्वर रेंज मु.पो.देवराष्ट्रे ता.कडेगाव जि.सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी (वन्यजीव)विचारे मळा कोल्हापूर. |
| ४३ | ३०१३ | २०२५ | सांगली | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल (वन्यजीव) चांदोली रेंज मु.पो.चांदोली ता.शिराळा जि.सांगली. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) चांदोली राष्ट्रीय उद्यान मुख्यालय स्थित कराड, जि.सातारा. |
| ४४ | २९९३ | २०२५ | सातारा | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र पाटण रेंज चाफोली रोड, जि.सातारा. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग,सातारा. |
| ४५ | २९९७ | २०२५ | सातारा | जन माहिती अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, सातारा. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यालय सामाजिक वनीकरण विभाग, सातारा. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४६ | ३०१४ | २०२५ | सातारा | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परीक्षेत्र दहिवडी रेंज, जि.सातारा. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग,सातारा. |
| ४७ | ३०१५ | २०२५ | सातारा | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परीक्षेत्र वडुज रेंज, जि.सातारा. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग,सातारा. |
| ४८ | ३०१६ | २०२५ | सातारा | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परीक्षेत्र मेढा रेंज ता.मेढा जि.सातारा. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग,सातारा. |
| ४९ | ३०१७ | २०२५ | सातारा | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परीक्षेत्र खंडाळा रेंज, जि.सातारा. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग,सातारा. |
| ५० | ३०१८ | २०२५ | सातारा | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परीक्षेत्र वाई रेंज ता.वाई जि.सातारा. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग,सातारा. |
| ५१ | ३०१९ | २०२५ | सातारा | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परीक्षेत्र कोरेगाव रेंज, जि.सातारा. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग,सातारा. |
| ५२ | ३०२० | २०२५ | सातारा | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परीक्षेत्र कराड रेंज, जि.सातारा. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग,सातारा. |
| ५३ | ३०२१ | २०२५ | सातारा | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परीक्षेत्र फलटण रेंज, जि.सातारा. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग,सातारा. |
| ५४ | ३००१ | २०२५ | सातारा | जन माहिती अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यलय सामाजिक वनीकरण (गोडोली) विभाग, सातारा. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यलय सामाजिक वनीकरण (गोडोली) विभाग,सातारा. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५५ | ३००२ | २०२५ | सातारा | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र साताारेंज गोडोली ता.जि. सातारा. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी कार्यलय सामाजिक वनीकरण (गोडोली) विभाग, सातारा. |
| ५६ | ३०११ | २०२५ | सातारा | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल (वन्यजीव) ढेबेवाडी रेंज मु.पो.ढेबेवाडी ता.पाटण जि.सातारा. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) चांदोली राष्ट्रीय उद्यान मुख्यालय स्थित कराड, जि.सातारा. |
| ५७ | ३०१२ | २०२५ | सातारा | जन माहिती अधिकारी, वनक्षेत्रपाल (वन्यजीव) हेळवाक रेंज मु.पो.हेळवाक ता.पाटण जि.सातारा. | प्रथम अपिलीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) चांदोली राष्ट्रीय उद्यान मुख्यालय स्थित कराड, जि.सातारा. |
| ५८ | २९९४ | २०२५ | सातारा | जन माहिती अधिकारी, उपसंचालक सह्याद्री व्याघ्र राखीव,कराड आगाशीवनगर,पो.मलकापूर, जि.सातारा. | प्रथम अपिलीय अधिकारी, उपसंचालक सह्याद्री व्याघ् राखीव,कराड आगाशीवनगर,पो.मलकापूर, जि.सातारा. |
| ५९ | १२३९ | २०२५ | सातारा | वनक्षेत्रपाल (वन्यजीव), कांदाढरेंज मु. पो. बामलोणी,ता. जावळी,जि. सातारा.४१५००२ | सहाय्यक वनसंरक्षक (वन्यजीव), सहाय्यक वनसंरक्षक (वन्यजीव) कोयना ता. पाटण,जि. सातारा. |
| ६० | १०८७ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग सांगोला ता.सांगोला,जि. सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद सोलापूर. |
| ६१ | १०८८ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग सांगोला ता.सांगोला,जि. सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद सोलापूर. |
| ६२ | १०८९ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग अक्कलकोट,जि. सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद सोलापूर. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६३ | १०९० | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग अक्कलकोट,जि. सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद सोलापूर. |
| ६४ | १०९१ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग दक्षिणसोलापूर ता.दक्षिणसोलापूर,जि. सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद सोलापूर. |
| ६५ | १०९२ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग दक्षिणसोलापूर ता.दक्षिणसोलापूर,जि. सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद सोलापूर. |
| ६६ | १०९३ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग उत्तरसोलापूर,जि. सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद सोलापूर. |
| ६७ | १०९४ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग उत्तरसोलापूर,जि. सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद सोलापूर. |
| ६८ | १०९५ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग मोहोळ, जि. सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद सोलापूर. |
| ६९ | १०९६ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग मोहोळ, जि. सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद सोलापूर. |
| ७० | १०९७ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग मंगळवेढा, जि. सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद सोलापूर. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७१ | १०९८ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग मंगळवेढा, जि. सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद सोलापूर. |
| ७२ | १३४५ | २०२५ | सोलापूर | उपअभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, माळशिरस, जि. सोलापूर. | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग सोलापूर. |
| ७३ | १३४६ | २०२५ | सोलापूर | उपअभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, करमाळा, जि. सोलापूर. | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग सोलापूर. |
| ७४ | १३४७ | २०२५ | सोलापूर | उपअभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, बार्शी, जि. सोलापूर. | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग सोलापूर. |
| ७५ | १३४८ | २०२५ | सोलापूर | उपअभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, पंढरपूर, जि. सोलापूर. | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग सोलापूर. |
| ७६ | १३४९ | २०२५ | सोलापूर | उपअभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, कुर्डुवाडी, जि. सोलापूर. | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग सोलापूर. |
| ७७ | २४५५ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद सोलापूर. |
| ७८ | १२४० | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, समग्र शिक्षण विभाग पंचायत समिती करमाळा, जि. सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, पंचायत समिती करमाळा,जि. सोलापूर. |
| ७९ | १२४१ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, समग्र शिक्षण विभाग पंचायत समिती करमाळा, जि. सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, पंचायत समिती करमाळा,जि. सोलापूर. |
| ८० | १२४२ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, समग्र शिक्षण विभाग पंचायत समिती करमाळा, जि. सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, पंचायत समिती करमाळा,जि. सोलापूर. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८१ | १२४३ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, समग्र शिक्षण विभाग पंचायत समिती करमाळा, जि. सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, पंचायत समिती करमाळा,जि. सोलापूर. |
| ८२ | २४५४ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, गटविकास अधिकारी पंचायत समिती करमाळा जि.सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, गटविकास अधिकारी पंचायत समिती करमाळा जि.सोलापूर. |
| ८३ | २५०३ | २०२५ | सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय मु.पो.पारेवाडी ता.करमाळा,जि.सोलापूर. | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती करमाळा ता.करमाळा जि.सोलापूर. |
| ८४ | २५०४ | २०२५ | सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय मु.पो.कोर्टी ता.करमाळा,जि.सोलापूर. | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती करमाळा ता.करमाळा जि.सोलापूर. |
| ८५ | २५०५ | २०२५ | सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय मु.पो.वाशिंबे.करमाळा, जि.सोलापूर. | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती करमाळा ता.करमाळा जि.सोलापूर. |
| ८६ | २५०६ | २०२५ | सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय मु.पो.वांगी नं.३ .करमाळा, जि.सोलापूर. | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती करमाळा ता.करमाळा जि.सोलापूर. |
| ८७ | २५०२ | २०२५ | सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय मु.पो.केम ता.करमाळा, जि.सोलापूर. | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती करमाळा ता.करमाळा जि.सोलापूर. |
| ८८ | २५०८ | २०२५ | सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय मु.पो.नेरले करमाळा, जि.सोलापूर. | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती करमाळा ता.करमाळा जि.सोलापूर. |
| ८९ | २५०९ | २०२५ | सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय मु.पो.जिंती करमाळा, जि.सोलापूर. | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती करमाळा ता.करमाळा जि.सोलापूर. |
| ९० | २५१० | २०२५ | सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय मु.पो.हिंगणी करमाळा,जि.सोलापूर. | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती करमाळा ता.करमाळा जि.सोलापूर. |
| ९१ | २५११ | २०२५ | सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय मु.पो.सालसे करमाळा,जि.सोलापूर. | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती करमाळा ता.करमाळा जि.सोलापूर. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९२ | २५१२ | २०२५ | सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय मु.पो.कंदर करमाळा,जि.सोलापूर. | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती करमाळा ता.करमाळा जि.सोलापूर. |
| ९३ | १२४४ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर. | तहसिलदार, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर. |
| ९४ | १२४५ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय, उत्तर सोलापूर,जि. सोलापूर. | तहसिलदार, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय, उत्तर सोलापूर,जि. सोलापूर. |
| ९५ | १२४६ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय,उत्तर सोलापूर,जि. सोलापूर. | तहसिलदार, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय,उत्तर सोलापूर,जि. सोलापूर. |
| ९६ | १२४७ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, निवडणूक विभाग तहसिल कार्यालय,ता. अक्कलकोट,जि. सोलापूर | तहसिलदार, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय,उत्तर सोलापूर,जि. सोलापूर. |
| ९७ | १२४८ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, निवडणूक विभाग तहसिल कार्यालय,ता. अक्कलकोट,जि. सोलापूर. | तहसिलदार, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय,उत्तर सोलापूर,जि. सोलापूर. |
| ९८ | १२४९ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, निवडणूक विभाग तहसिल कार्यालय,ता. अक्कलकोट,जि. सोलापूर | तहसिलदार, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय,उत्तर सोलापूर,जि. सोलापूर. |
| ९९ | २५२० | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, निवडणूक विभाग तहसिल कार्यालय ता.उत्तर सोलापूर जि.सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, निवडणूक विभाग तहसिल कार्यालय ता.उत्तर सोलापूर जि.सोलापूर. |
| १०० | २५२१ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, निवडणूक विभाग तहसिल कार्यालय ता.उत्तर सोलापूर जि.सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, निवडणूक विभाग तहसिल कार्यालय ता.उत्तर सोलापूर जि.सोलापूर. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०१ | २२२४ | २०२५ | सोला पूर | जन माहिती अधिकारी, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय,करमाळा जि.सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय,करमाळा जि.सोलापूर. |
| १०२ | २२२५ | २०२५ | सोला पूर | जन माहिती अधिकारी, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय,करमाळा जि.सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय,करमाळा जि.सोलापूर. |
| १०३ | २२२७ | २०२५ | सोला पूर | जन माहिती अधिकारी, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय,करमाळा जि.सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय,करमाळा जि.सोलापूर. |
| १०४ | २५०७ | २०२५ | सोला पूर | जन माहिती अधिकारी, निवडणूक विभाग तहसिल कार्यालय ता.करमाळा जि.सोलापूर. | तहसिलदार, निवडणूक विभाग तहसिल कार्यालय ता.करमाळा जि.सोलापूर. |
| १०५ | २५२४ | २०२५ | सोला पूर | जन माहिती अधिकारी, निवडणूक विभाग तहसिल कार्यालय ता.करमाळा जि.सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, निवडणूक विभाग तहसिल कार्यालय ता.करमाळा जि.सोलापूर. |
| १०६ | २२२३ | २०२५ | सोला पूर | जन माहिती अधिकारी, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय, सांगोला, जि.सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय, सांगोला, जि.सोलापूर. |
| १०७ | २२२८ | २०२५ | सोला पूर | जन माहिती अधिकारी, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय, सांगोला, जि.सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय, सांगोला, जि.सोलापूर. |
| १०८ | २२३० | २०२५ | सोला पूर | जन माहिती अधिकारी, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय, सांगोला, जि.सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, निवडणुक विभाग तहसिल कार्यालय, सांगोला, जि.सोलापूर. |
| १०९ | २५२५ | २०२५ | सोला पूर | जन माहिती अधिकारी, निवडणूक विभाग तहसिल कार्यालय ता.सांगोला जि.सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, निवडणूक विभाग तहसिल कार्यालय ता.सांगोला जि.सोलापूर. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११० | २५२६ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, निवडणूक विभाग तहसिल कार्यालय ता.सांगोला जि.सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, निवडणूक विभाग तहसिल कार्यालय ता.सांगोला जि.सोलापूर. |
| १११ | २५२२ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, निवडणूक विभाग तहसिल कार्यालय अक्कलकोट जि.सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, निवडणूक विभाग तहसिल कार्यालय अक्कलकोट जि.सोलापूर. |
| ११२ | २५२३ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, निवडणूक विभाग तहसिल कार्यालय अक्कलकोट जि.सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, निवडणूक विभाग तहसिल कार्यालय अक्कलकोट जि.सोलापूर. |
| ११३ | २५०० | २०२५ | सोलापूर | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय करमाळा जि.सोलापूर. | तहसिलदार, तहसिल कार्यालय करमाळा जि.सोलापूर. |
| ११४ | २५०१ | २०२५ | सोलापूर | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय करमाळा जि.सोलापूर. | तहसिलदार, तहसिल कार्यालय करमाळा जि.सोलापूर. |
| ११५ | २४५६ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर. |
| ११६ | २५१३ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग ता.करमाळा जि.सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग ता.करमाळा जि.सोलापूर. |
| ११७ | २५१४ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग ता.करमाळा जि.सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग ता.करमाळा जि.सोलापूर. |
| ११८ | २५१५ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग ता.करमाळा जि.सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग ता.करमाळा जि.सोलापूर. |
| ११९ | २५१६ | २०२५ | सोलापूर | जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग ता.करमाळा जि.सोलापूर. | प्रथम अपिलीय अधिकारी, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग ता.करमाळा जि.सोलापूर. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२० | २५१७ | २०२५ | सोलापूर | मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय,करमाळा जि.सोलापूर. | उप अधिक्षक, उप अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय,करमाळा जि.सोलापूर. |
| १२१ | २५१८ | २०२५ | सोलापूर | मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय,करमाळा जि.सोलापूर. | उप अधिक्षक, उप अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय,करमाळा जि.सोलापूर. |
| १२२ | २५१९ | २०२५ | सोलापूर | मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, करमाळा जि.सोलापूर. | उप अधिक्षक, उप अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय,करमाळा जि.सोलापूर. |